**स्मरण निवेदन ५ वे** **दि.१०.१०.२०२५**

**प्रति,**

**मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

**मा. सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य सहकार, विपणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.**

**मा. प्रधान सचिव, सहकार, विपणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.**

**मा. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे.**

**विषय : प्रमाणित लेखापरीक्षकांच्या हक्क, मान्यता, पेन्शन, संरक्षण, ओळखपत्र आणि 'प्रमाणित लेखापरीक्षक आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करण्याबाबत शासन निर्णय घेण्याविषयी निवेदन.**

**महोदय,**

मी खाली सही करणारा सचिन धनंजय मुधोळकर, महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागामार्फत मान्यताप्राप्त प्रमाणित लेखापरीक्षक असून, अनेक वर्षांपासून ग्रामीण व नागरी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण प्रामाणिकपणे पार पाडत आहे.

मात्र, आम्हा प्रमाणित लेखापरीक्षकांच्या कार्याचा दर्जा, जोखीम आणि जबाबदारी विचारात घेता शासनाने आमच्यासाठी अद्याप कोणतीही सामाजिक, आर्थिक किंवा प्रशासकीय सुरक्षा व्यवस्था निर्माण केलेली नाही. हे शासनाच्या न्याय, समानता व मानवाधिकारांच्या तत्वांना धरून नाही.

मुद्देनिहाय निवेदन :

❖ लेखापरीक्षण फी (Audit Fee): शासन निर्णय दिनांक ०५/०६/२०१४ नुसार Audit Fee आकारणी करण्यात येते. मात्र सद्य परिस्थितीत महागाई दर, वाहतूक खर्च, दस्तऐवज शुल्क व वेळ यांचा विचार करता हा दर अत्यंत अपुरा आहे. त्यामुळे Audit Fee पुनर्निर्धारित करून वार्षिक वाढीचा दर निश्चित करावा.

❖ पेन्शन व मानधन : प्रमाणित लेखापरीक्षक हे शासनाने मान्यता दिलेले व शासनाच्या लेखापरीक्षण अहवालावर थेट शासन कारवाई करते. त्यामुळे आम्ही लोकसेवकांच्या श्रेणीत येतो. भारतीय संविधानाचा अनुच्छेद 14 (समानतेचा हक्क) आणि अनुच्छेद 41 (सामाजिक सुरक्षा) नुसार आम्हालाही पेन्शन योजना व आरोग्य विमा योजना देणे शासनाचे कर्तव्य आहे.

❖ सुरक्षा आणि संरक्षण व्यवस्था : अनेक वेळा लेखापरीक्षण करताना काही संस्थांमध्ये धमक्या, दबाव किंवा हल्ले सहन करावे लागतात. म्हणून प्रमाणित लेखापरीक्षकांसाठी "राज्यस्तरीय संरक्षण यंत्रणा" आणि "विमा संरक्षण योजना" राबवावी.

❖ ओळखपत्र व मान्यता क्रमांक : प्रत्येक प्रमाणित लेखापरीक्षकास शासनाकडून स्मार्ट ओळखपत्र (Government ID Card) दिले जावे, जेणेकरून अधिकृत कागदपत्र तपासणी दरम्यान त्यांना शासन अधिकारी म्हणून सन्मान मिळेल.

❖ 'प्रमाणित लेखापरीक्षक आर्थिक विकास महामंडळ' स्थापन : शासनाने इतर व्यावसायिकांसाठी (उदा. पत्रकार कल्याण मंडळ, कलाकार महामंडळ इत्यादी) महामंडळ स्थापन केलेले आहे. त्याच धर्तीवर "प्रमाणित लेखापरीक्षक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य" स्थापन करून, त्यामार्फत लेखापरीक्षकांच्या कल्याण, प्रशिक्षण, कर्ज व विमा योजना राबवाव्यात.

❖ लोकप्रतिनिधित्व व विधानपरिषदेत प्रतिनिधी : प्रमाणित लेखापरीक्षक हे समाजातील आर्थिक शिस्त व पारदर्शकतेसाठी शासनाचे थेट सहयोगी आहेत. त्यामुळे विधानपरिषदेत सहकार विभागांतर्गत एक "प्रमाणित लेखापरीक्षक प्रतिनिधी" ची तरतुद करावी., जो आमच्या समस्या व हक्कांची मांडणी शासनासमोर करू शकेल.

❖ जीवनावश्यक आर्थिक अडचणी : सध्याच्या परिस्थितीत आम्हाला वर्षभर काम असले तरी मिळणारे मानधन अत्यंत कमी असल्याने कुटुंबाचा उदर निर्वाह जगणे कठीण झाले आहे. त्यामुळे लेखापरीक्षकांना वार्षिक जीवननिर्वाह भत्ता (Cost of Living Allowance) देण्यात यावा.

कायदेशीर व संवैधानिक आधार :

➢ भारतीय संविधान अनुच्छेद 14 – समानतेचा हक्क
➢ अनुच्छेद 19(1)(g) – व्यवसाय करण्याचा हक्क
➢ अनुच्छेद 41 व 43 – सामाजिक सुरक्षा व जीवनमानाचा अधिकार
➢ महाराष्ट्र सहकारी अधिनियम 1960 – कलम 81
➢ महाराष्ट्र सहकारी नियम 1961 – नियम 69 व 70
➢ शासन निर्णय दिनांक 05/06/2014 – सहकार विभाग

वरील पार्श्वभूमीवर नम्र विनंती अशी की

1. "प्रमाणित लेखापरीक्षक आर्थिक विकास महामंडळ" स्थापन करण्यात यावे.

2. सर्व प्रमाणित लेखापरीक्षकांना शासनमान्य ओळखपत्र व पेन्शन योजना लागू करण्यात यावी.

3. Audit Fee चे नवीन दर जाहीर करून वार्षिक पुनरावलोकन बंधनकारक करावे.

4. सुरक्षा, विमा व मानधनाच्या योजना शासनस्तरावर राबवाव्यात.

5. विधानपरिषदेत एक अधिकृत "प्रमाणित लेखापरीक्षक प्रतिनिधी" ची तरतुद करावी. .

ही मागणी शासनाच्या न्याय, पारदर्शकता व सहकार क्षेत्राच्या सशक्तीकरणाच्या उद्देशाने करण्यात येत असून, शासनाने यावर तातडीने निर्णय घ्यावा, ही नम्र विनंती करीत आहे.

आपलाच विश्वासू

सचिन धनंजय मुधोळकर